**तक्रार यूएलपी क्र ८८/२०२०.**
**नि क्र यूडब्ल्यू १ श्री अरुण सौदागार राउत .**

शपथेवर कथन करतो की;

**माझे नाव श्री अरुण सौदागार राउत**

वय. ५७ वर्षे राहणार.मानेगाव; ता.माढा; जि.सोलापूर आज मुक्कामी सोलापूर.

मी याकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि क्र यूडब्ल्यू १ खाली दाखल केले असून ते मी वाचले आहे त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. मला प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त अन्य काही सांगायचे नाही.

**<u>पुढील सरतपास तक्रारदारातर्फे श्री व्ही आर देशपांडे विधिज्ञ यांचेतर्फे</u>**

१३. आता मला कागदपत्र यादी नि क्र यू ६ दाखविण्यात आला. त्यातील अ क्र १ वरती कामावरुन कमी केल्याचा आदेश दि ०९.०७.२०१२ **<u>नि क्र यू ८</u>** वरती आहे. अ क्र २ सामनेवाले यांचे पर्यायी नेमणुकीबाबतचे पत्र दि १६.११.२०१७ **<u>नि क्र यू ९</u>** वरती आहे. अ क्र ३ वरती सामनेवाले यांचे दि २७.०९.२०१७ रोजीचे आदेश नोकरीपूर्व वैद्यकीय तपासणीला हजर होण्याबाबत **<u>नि क्र यू १०</u>** वरती आहे. अ क्र ४ वर कामावर हजर करुन घेणेबाबत दिलेला विनंती अर्ज दि १८.११.२०१७ वरती दाखल केला आहे.

**<u>सरतपासणी पूर्ण</u>**

**उलटतपासणी सामनेवाले श्री एस डी होसमनी विधिज्ञ यांचेतर्फे**

१४. हे म्हणणे बरोबर आहे की मी प्रथमत सामनेवाले यांचेकडे दि १०.११.१९९६ रोजी चालक म्हणून करमाळा येथे कामास लागलो माझा चालक क्र ४२८०७ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की मला अर्धागवायूचा त्रासामुळे दि ०१.०१.२०११ ते दि २७.०६.२०१२ या कालावधीत रजेवर होते. हे म्हणणे खरे आहे की मला श्री छत्रपती शिवाजी महाराज सवौपचार रुग्णालय सोलापूर येथे वैद्यकीय तपासणीकरिता पाठविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की वैद्यकीय तपासणीनंतर मला दोन्ही हाता पायाला व मणक्यात ताकद नसल्याचे वैद्यकीय अहवाल देण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मला दि ०९.०७.२०१२ रोजीपासून चालक पदावरुन सेवेतून कमी करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की मला सेवेतून कमी केल्याचा दि ०९.०७.२०१२ रोजीचा आदेश मी आव्हानित केला नाही. मी पुन्हा सांगतो की दि ०९.०७.२०१२ रोजीचा आदेश मी आव्हान केलेला नाही .

१५. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी पर्यायी शिपाई पदाच्या नोकरीकरिता सामनेवाले यांचेकडे अर्ज केला. हे म्हणणे खरे आहे की मला शिपाई पदी नेमणुक देण्यात आली. मी कामावर हजर होताना विनातक्रार स्वेच्छेने शिपाई पदाचे नोकरी स्वीकारले आहे. हे म्हणणे खरे आहे की दि ०९.०७.२०१२ ते दि १७.११.२०१७ पर्यंत एकूण ११५८ दिवस असाधारण रजा म्हणून गणण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की दि ०९.०७.२०१२ ते दि १७.११.२०१७ या

कालावधीतील वेतन फरक मिळण्यास मी पात्र नाही. हे म्हणणे खरे आहे की मला चालक पदाचा वेतन संरक्षित करून शिपाई पदाचे वेतननिश्चित करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की सामनेवाले यांनी कोणताही अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केला नाही. हे म्हणण खरे नाही की सरतपासाचे प्रतिज्ञापत्र व त्यातील मजकूर खोटा व मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपास काही नाही**

सही/—
(मु.रा.कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.
दिनांक.०१.०८.२०२५
*माकम*